# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.

जिल्हा विशेष शाखा, सातारा
९३, मल्हार पेठ, सातारा फोन नंबर ०२१६२-२३४२३१
Email – pidsb.satara@mahapolice.gov.in


क्रमांक:जिविशा-१/जिप-पंस निवडणूक/वाहतुक मार्गातीलबदल /२०२६- ९४३ सातारा, दिनांक : ०८/०२/२०२६

## महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३४ प्रमाणे अधिसूचना

ज्या अर्थी, माझ्या असे निदर्शनास आले आहे की, **कोरेगांव** पोलीस ठाणे हद्दीत **जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६, कोरेगाव तालुका मतमोजणी डी.पी.भोसले कॉलेज (स्ट्रँगरुम) कोरेगाव येथे** दिनांक ०९/०२/२०२६ रोजी सकाळी ०७.०० वा. चे पासून मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे.

दिनांक ०९/०२/२०२६ रोजी मतमोजणी प्रक्रियेदरम्यान मतमोजणीचे ठिकाणी वाहतुक कोंडी होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून खाली दर्शविले प्रमाणे वाहतुक व्यवस्था आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्या अर्थी मी, **तुषार दोशी, पोलीस अधीक्षक,सातारा** मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारास अनुसरुन दिनांक ०९/०२/२०२६ रोजी सकाळी ०५.०० ते १८.०० वाजेपर्यंत खालील नमुद रस्त्यावरील वाहतुकीच्या मार्गात खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| अ.क्र. | बंद करण्यात आलेला मार्ग | बदल करण्यात आलेला पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १ | कोरेगाव मॅफको चौक ते काटे पेट्रोल पंप कोरेगाव असा मुख्य रस्ता वाहतुक बंद करणे बाबत. **(मुख्य मतमोजणी ठिकाणापासुन ७०० मिटर बंद.)** | **कोरेगाव कडून रहिमतपुर कडे जाताना** - कोरेगाव मॅफको चौक येथुन -सुभाषनगर -सुलतानवाडी रोड-शाहुनगर कणसे बिल्डींग-धोम डावा कालवा - काटे पेट्रोल पंप ते रहिमतपुर बाजुकडे. **(रहिमतपुर कडून कोरेगाव कडे जाण्या करीता वरील प्रमाणे उलट मार्ग.)** |

**वरील वाहतुकीचा बदल दिनांक ०९/०२/२०२५ रोजी ०५.०० ते १८.०० वा. पर्यत राहील.**

**वरील सर्व मार्गावर रुग्णवाहीका, अग्निशमन वाहने, पोलीस दलाची वाहने व निवडणुक प्रक्रियेतील वाहने वगळुन इतर सर्व वाहनांच्या मार्गात बदल करणेत येत आहे.**

तरी वरील नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधीतांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल. याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

हा आदेश माझी स्वाक्षरी व शिक्क्यानिशी आज दि. ०८/०२/२०२६ रोजी काढण्यात आला आहे.

(तुषार दोशी)भापोसे
पोलीस अधीक्षक सातारा

ठिकाण - सातारा
दिनांक - ०८/०२/२०२६

**प्रत : माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी**

१. जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,सातारा.
२. सर्व दैनिक वृत्तपत्रे संपादक व प्रतिनिधी.

**प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

१. सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा.
२. सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, सातारा जिल्हा.
३. विभाग नियंत्रक,राज्य परिवहन महामंडळ,सातारा.

Scanned with OKEN Scanner